**नि.दि.दा. क्र. ९७/२०२२**
**भिमराव वि. अर्जुन**
**CNR No.MHWS080013322022**

**<u>निशाणी क्र. ०५ खाली आदेश</u>**
**(पारित दिनांक १७.०७.२०२३)**

वादीने सदरचा अर्ज प्रतिवादीविरुध्द तुर्तातुर्त ताकदीचा आदेश मिळणेकरीता दाखल केला आहे. त्यांच्या कथनानुसार सदरचा दावा कायम मनाई हुकुमाचा असुन सदर प्रकरणात नि.क्र. ०५ खाली अंतरिम मनाई हूकुम मिळणेबाबतचा अर्ज दाखल आहे. वाद मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जीत मिळकत आहे. गट क्र. ८४ क्षेत्र ११ हे. ५७ आर., हिस्सा पुर्ण (दावा जमीन) बाबत रिसोड न्यायालयात वादीच्या हिश्याची वाटणी व वेगळा ताबा मिळणेकरिता नि.दि.दा. क्र. १२३/२००६ हा दावा दाखल केला होता. नि.दि.दा. क्र. १२३/२००६ या दाव्यात दिनांक १६.०२.२०१६ रोजी निकाल होऊन वाशिम न्यायालयात अपील क्र. २९/२०१६ दाखल केला असुन तो प्रलंबित आहे. वाद मिळकतीबाबत अपील प्रकरण असुन वादीने त्याचा हिस्सा वाटून ताब्यात मिळण्याची मागणी केलेली आहे. परंतु वाद मिळकत प्रतिवादी हे विकण्याच्या किंवा हस्तांतरण करण्याच्या प्रयत्नात असल्याने नि.क्र. ०५ वरील आदेश होवून त्यांना रोखने आवश्यक असल्याने तसा तुर्तातुर्त मनाई आदेश पारित करण्याची विनंती केली.

**<u>०२</u>** प्रतिवादीच्या वकीलांनी अर्जावर आक्षेप दाखल करुन नि.क्र. ०९ खाली जबाब दावा दाखल करुन वाद मिळकतीबाबत परिच्छेद क्र. ०२ मधील न्यायालय कार्यवाही झालेबाबतचा मजकुर मान्य करुन इतर मजकूर अमान्य केला. वादीने रिसोड न्यायालयात दाखल केलेला वाटणीचा दावा खारीज झाला असून प्रतिवादीला वाद मिळकत विकण्याचा किंवा हस्तांतरण करण्याचा पुर्ण अधिकार असल्याचे सांगून सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

**<u>०३</u>** दोन्ही पक्षाचे कथन ऐकले. दोन्ही पक्षांच्या वकिलांचा युक्तीवाद, दोन्ही पक्षांनी दाखल केलेल्या दस्तऐवजावरुन खालील मुद्दे निष्कर्षाकरीत माझ्या समोर उपस्थित झाले. सदर मुद्यांची कारणमिमांसा देऊन खालील प्रमाणे निष्कर्ष नोंदविण्यात आलेले आहेत.

| अनु.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी त्याचा अर्ज प्रथमदर्शनी सिध्द करतो काय ? | नाही |
| २. | पुराव्याचा समतोल कोणाच्या बाजुने आहे ? | प्रतिवादीच्या |
| ३. | अर्ज नामंजूर केल्यास कोणाचे नुकसान होणार आहे ? | प्रतिवादीचे |
| ४. | अंतिम आदेश व हुकूमनामा काय ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. ०१ ते ०४** -

**०४** मुद्दे क्र. ०१ ते ०३ एकमेकांशी संलग्नीत असल्यामुळे चर्चेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता ते एकत्रीतरित्या चर्चेस घेण्यात आले आहेत. वादीचे कथन थोडक्यात असे की, मौजे मोहोजा इंगोले ता.रिसोड जि. वाशिम येथील शेतजमीन गट क्र. ८४ मधील ११ हे. ५७ आर., हिस्सा पुर्ण जिच्या चर्तुःसिमा पुर्वेस– नागोराव बाबुराव यांचे शेत, पश्चिमेस–नथ्थु राघोजी शिंदे यांचे शेत, दक्षिणेस–आनंदा रामजी शिंदे यांचे शेत आणि उत्तरेस–राधाकिसन सखाराम जाधव यांचे शेत आहे. (सदरच्या मिळकतीस यापुढे "**वाद मिळकत"** असे संबोधण्यात येते.)

**०५** वादीच्या कथनानुसार, वाद मिळकत ही वडीलोपार्जीत असून वादी आणि प्रतिवादी हे भाऊ आहेत. वादीने वाद मिळकतबाबत वादीच्या हिश्याची वाटणी व वेगळा ताबा मिळणे बाबत नि.दि.दा. क्र. १२३/२००६ हा दाखल केला होता. त्या दाव्यात परिच्छेद क्र. ०१ मध्ये नमुद केलेल्या जमिनीच्या चतु:सिमा नमुद केलेल्या आहेत. नि.दि.दा. क्र. १२३/२००६ या प्रकरणाचा निकाल दिनांक १६.०२.२०१६ रोजी झाला. त्या प्रकरणाच्या निकालाविरोधात मा. वाशिम न्यायालयात पुनर्विलोकन याचिका क्र. २९/२०१६ भिमराव व सखाराम तुरुकमाने वि. सखाराम तुकाराम तुरुकमाने (मयत) वगैरे यांना पक्षकार केलेले असून दावा न्यायप्रविष्ठ असून त्यात वादीने त्याचा हिस्सा वाटून ताब्यात मिळण्याची मागणी केलेली आहे.

**०६** वादीने मा. जिल्हा न्यायालयत, वाशिम न्यायालयामध्ये कायमचा मनाई हुकूम आणि करणात्मक मनाई हुकूममिळणे बाबत दिवाणी दावा क्र. १६५/२०१९ भिमराव सखाराम तुरुकमाने विरुद्ध भुसंपादन अधिकारी + ०४ दाखल असुन प्रतिवादी अर्जुन यास प्रतिवादी म्हणुन जोडलेले असून तो दावा न्यायप्रविष्ठ आहे. नि.दि.दा. क्र.

१६५/२०१९ मध्ये अपीलाचा निकाल लागेपर्यंत व त्या नंतरच्या अपीलमधील न्यायालयाचा अंतीम निकाल लागेपर्यंत वाद मिळकतीबाबत भुसंपादनाचा मोबदला, वाडी रायताळ सिंचन प्रकल्प अंतर्गत लघु पाटबंधारे विभाग (मायनर इरिगेशन डिव्हीजन) यांच्या मार्फत भुसंपादन प्रकरणाअंतर्गत वाद मिळकतीचा अंतीम निकाल लागेपर्यंत कायम मनाईहुकूम व भुसंपादनच्या मोबदल्याची संपुर्ण रक्कम दिवाणी प्रकरणाच्या अंतीम निकाल लागेपर्यंत आणि कायद्याच्या तरतुदीप्रमाणे योग्य त्या ठिकाणी गुंतवणे बाबतचा करणात्मक मनाई हुकूमाची देखील मागणी केलेली असुन व त्या अनुषंगाने ईतरही मागण्या केलेल्या आहेत.

<u>०७</u> पुनर्विलोकन याचिका क्र. २९/२०१६ व नि.दि.दा.क्र. १६५/२०१९ हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असून प्रकरणात वाद मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडिलोपार्जित मालमत्ता असून त्यात वादीचा जन्मतः हक्क, अधिकार, हिस्सा असून या प्रकरणातील प्रतिवादी ने वाद मिळकतीमधील ०० हे. ८३ आर., जमीन दिनांक २०.०५.२०२२ रोजी सौ. सुशिला विजय शिंदे हिस विकली. त्याबाबत सुध्दा वादी न्यायालयात दाद मागणारच आहे. वाद मिळकतीबाबत न्यायालयांमध्ये प्रकरणे प्रलंबित असतांनाही सदर गैरकायदेशीर व्यवहार झालेला आहे असून वाद मिळकत सुध्दा प्रतिवादी विकण्याच्या व हस्तांतरण करण्याच्या तयारीत आहे. प्रतिवादीला वाद मिळकत विकण्याचा कोणताही कायदेशिर अधिकार नाही. वाद मिळकत विकल्यास वादीचे अतोनात, अपरिमित कधीही न भरुन निघणारे नुकसान होणार होईल व प्रकरणांमध्ये कायदेशीर व तांत्रीक गुंतागुंत व अडचण निश्चितपणे निर्माण होणार आहे. त्यामुळे वादीने न्यायालयीन प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत वाद मिळकत ही ईतर कोणासही विकु नये अथवा हस्तांतरीत करु नये, या बाबतचा कायमचा मनाईहुकूम मागितला आहे. त्यामुळे वादीला प्रस्तुतचा दिवाणी दावा दाखल करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. प्रस्तुत दिवाणी दाव्याचा निकाल लागण्याकरीता बराच कालावधी लागणार व प्रतिवादी हा दावा मिळकत विकण्याच्या किंवा हस्तांतरीत करण्याची शक्यता असल्याने वादीने सदर दावा दाखल करुन सदर दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादीने वाद मिळकतीत कुठल्याही प्रकरचा विक्री किंवा हस्तांतरण करु नये, असा तात्पुरता मनाईहुकूम मागितला आहे.

<u>०८</u> याउलट प्रतिवादीच्या वकीलांनी नि.क्र. ०९ वरील जवाब दाव्यानुसार वादीचे सर्व कथन नाकारले. तसेच वाद मिळकतीबाबत परिच्छेद क्र. ०२ मधील न्यायालय

कार्यवाही झालेबाबतचा मजकुर मान्य करुन इतर परिच्छेदातील मजकूर अमान्य केला. रिसोड न्यायालयात वादीने दाखल केलेला वाटणीचा दावा खारीज झाला असून प्रतिवादीला वाद मिळकत विकण्याचा किंवा हस्तांतरण करण्याचा पुर्ण अधिकार आहे. तसेच वादीने दाखल केलेली कागदपत्रे अभिलेखाचा भाग असल्याने त्याबाबत उत्तर देण्याची गरज नसल्याचे सांगुन तात्पुरता मनाईहुकूमाच्या अर्जातील विनंती ही खोटी व खोडसाळपणाची असल्याचे म्हटले.

**०९** त्याच्या कथनानुसार, पुर्वीचा रिसोड न्यायालयामध्ये दाखल केलेला वाटणीचा दावा खारीज झाला असल्याने सदरचा तात्पुरत्या मनाईहुकूमाचा अर्ज चालु शकत नाही. वाद मिळकत ही प्रतिवादीच्या एकट्याच्या मालकीची असल्याचा निकाल रिसोड न्यायालयाने दिलेला असून त्याला वाद मिळकत कोणासही विकण्याचा व हस्तांतरीत करण्याचा पुर्ण अधिकार आहे. वादीने सांगितल्याप्रमाणे वि. दिवाणी न्यायाधिश, व. स्तर, वाशीम येथे दावा मिळकतीबाबत वाद चालु असुन त्या दाव्यात प्रस्तुत प्रतिवादी हा सुद्धा प्रतिवादी क्र. ०५ असल्याने वादीला स्वतंत्र दावा दाखल करण्यास कोणतेही कारण नसल्याने वादीचा दावा चालु शकत नाही. मालमत्ता हस्तांतरण कायद्याच्या कलम ५२ प्रमाणे वादीला दावा करण्याचा अधिकार नाही. त्यामुळे वादीचा हा दावा व तात्पुरत्या मनाईहुकूमाचा अर्ज हा खोटा व खोडसाळपणाचा असुन प्रतिवादीला त्रास देण्याच्या वाईट उद्देशाने दाखल केलेला असल्याने तो खर्चासह खारिज करण्याची विनंती केली.

**१०** वादीने सदर दाव्यासोबत दस्त ऐवज यादी नि.क्र.०४ खाली दिनांक ०३.०७.२०१९ रोजी वाशिम न्यायालयात दाखल केलेल्या वादपत्राची सत्यप्रत, दिनांक २०.०५.२०२२ रोजीचे खरेदीखत, दिनांक २७.०६.२०२२ रोजीच्या अपीलाचा रोजनाम्याची प्रत, नि.दि.दा. क्र. १२३/२००६ दिनांक २७.०६.२०२२ रोजीच्या वादपत्राची सत्यप्रत, नि.दि.दा. क्र. १२३/२००६ निकालाची सत्यप्रत, वादीच्या आधारकार्डची छायांकीत प्रत आणि दिनांक २२.०८.२०२२ रोजीचा संगणकीकृत ७/१२ उता–याची प्रत दाखल केली आहे. याउलट प्रतिवादीने दस्तऐवज यादी नि.क्र. १२ खाली नियमित दिवाणी दावा क्र. १२३/२००६ च्या निकालाची प्रत दाखल केली.

**११** दोन्ही पक्षांचे कथन ऐकले. अभिलेखाचे एकंदरीत अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दोन्ही पक्षादरम्यान यापुर्वी सुध्दा रिसोड न्यायालयात वाद

मिळकतीसंबंधी दावा दाखल होता त्याचा नि.दि.दा.क्र. १२३/२००६ असा होता. सदर दावा दिनांक १६.०२.२०१६ रोजी खारिज करण्यात येउन निकाली काढण्यात आलेला आहे. सदर दावा वादीने वाटणीकरिता दाखल केला होता. त्यात गट क्र. ८४ मधील याच वाद मिळकतीचा समावेश होता. त्यानंतर वादीच्या कथनानुसार त्याने दि. १६.०२.२०१६ रोजीच्या निकालाने व्यथित होऊन पुनर्विलोकन याचिका क्र. २९/२०१६ व नि.दि.दा.क्र. १६५/२०१९ हे प्रकरण मा. जिल्हा न्यायालय, वाशिम येथे दाखल केले असुन ते न्यायप्रविष्ठ आहे.

**<u>१२</u>** सदर दोन्ही प्रकरणात वाद मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडिलोपार्जित मालमत्ता असून त्यात वादीचा जन्मतः हक्क, अधिकार, हिस्सा असल्याचे वादीचे कथन आहे. हा दावा व या अर्जानुसार वादीने अपीलाचा निकाल लागेपर्यंत व त्या नंतरच्या अपीलमधील न्यायालयाचा अंतिम निकाल लागेपर्यंत वाद मिळकतीबाबत भुसंपादनाचा मोबदला, वाडी रायताळ सिंचन प्रकल्प अंतर्गत लघु पाटबंधारे विभाग (मायनर इरिगेशन डिव्हीजन) यांच्या मार्फत भुसंपादन प्रकरणाअंतर्गत वाद मिळकतीचा अंतिम निकाल लागेपर्यंत कायम मनाईहुकूम व भुसंपादनाच्या मोबदल्याची संपुर्ण रक्कम दिवाणी प्रकरणाच्या अंतीम निकाल लागेपर्यंत आणि कायद्याच्या तरतुदीप्रमाणे योग्य त्या ठिकाणी गुंतवणे बाबतचा करणात्मक मनाई हुकूमाची मागणी केली असुन हा दावा निकाली निघेपर्यत प्रतिवादीने वादजमिन इतर कोणासही विकु नये अथवा हस्तांतरित करु नये असा तात्पुरता मनाईहुकूम मागितला आहे.

**<u>१३</u>** विद्यमान दिवाणी न्यायाधिश,व. स्तर यांच्याकडे दाखल दि.दा.क्र. १६५/२०१९ हा दावा सुध्दा कायम मनाईहुकूम व करणात्मक मनाईहुकूमाबाबात दि. ०३.०७.२०१९ रोजी दाखल केलेला असुन त्यात सुध्दा वादीने दाव्यासोबत तात्पुरता मनाईहुकूम मागितल्याबाबतचा मजकूर नमुद आहे. तसेच नि.दि.दा.क्र. १२३/२००६ च्या निकालाविरुध्दची अपिल सुध्दा प्रलंबित आहे. वादीच्या वकिलांनी दाखल केलेला अनुक्रमांक ८ वरील सातबारा उतारा प्रतिवादीच्या नावे जमिन दर्शवितो तसेच प्रतिवादीने विक्री केलेल्या जमिनीचे खरेदीखत सुध्दा वादीने दाखल केलेले आहे. परंतु प्रकरण क्र. १६५/२०१९ आणि पुनर्विलोकन याचिका क्र. २९/२०१६ या प्रकरणात तात्पुरता मनाईहुकूम किंवा स्थगन आदेश याबाबत वादीने काहीही कथन केलेले नाही. ती प्रकरणे मा. जिल्हा न्यायालय, वाशिम येथे दाखल केले असुन ते न्यायप्रविष्ठ असल्याचे दोन्ही

पक्षाचे कथन आहे.

**<u>१४</u>** वरील सर्व विवेचनावरुन अभिलेखावर दाखल केलेली दस्तऐवज हे वाद मिळकतीवरील प्रतिवादीची मालकी व ताबा सिध्द करतात. परंतु वाद मिळकतीच्याबाबत तात्पुरता मनाईहुकूम किंवा स्थगन आदेश आहे किंवा नाही ही बाब स्पष्ट झालेली नाही. परंतु सदर दावा दाखल केल्यानंतरही इतर न्यायालयात याच मिळकतीबाबत प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे दिसून येते. अभिलेखावर उपलब्ध दस्तऐवज प्रतिवादीच्या बाजुने प्रथमदर्शनी केस असल्याचे सिध्द करतात. दाखल करण्यात आलेले दस्तएेवज आणि वरील विवेचनावरुन पुराव्याचा समतोल सुध्दा प्रतिवादीच्या बाजुने दिसुन येतो. दोन्ही पक्षांच्या कथनावरुन वादी हा त्याची केस प्रथमदर्शनी सिध्द करत नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे वादीच्या हक्कात तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास प्रतिवादीचे अतोनात नुकसान होईल असे प्रथमदर्शनी दिसुन येते. वादीने सकृतदर्शनी केस सिध्द न केल्याने तो तात्पुरता मनाईहुकूम मिळण्यास या स्थितीला पात्र नसल्याचे दिसून येते.

**<u>१५</u>** तसेच या स्थितीला हे न्यायालय केवळ दोन्ही पक्षांच्या वकीलांनी केलेले कथन व त्यांनी दाखल केलेले दस्तऐवज यांच्या केवळ प्रारंभिक निरीक्षणावरुन सदर निर्णय घेत आहे. वस्तुस्थिती ही दोन्ही पक्षांची पुरावे बघुन गुणदोषाअंती न्यायनिर्णयावेळी स्पष्ट होईल. त्यामुळे आज रोजी उपलब्ध दस्तऐवजावरुन त्यामुळे मुददा क्र. ०१ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुददा क्र. ०२ व ०३ चे उत्तर प्रतिवादीचे हक्कात नोंदवून मुददा क्र. ०४ चे उत्तराकरिता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–आदेश –**

वादीचा अर्ज या स्थितीला नामंजूर करण्यात येतो.

स्वा/–

(यो.द. कोईनकर)

दिनांकः १७.०७.२०२३ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रिसोड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Rohit D. Pandit (Stenographer L.G.) |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 17.07.2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 17.07.2023 |
| Judgment/Order uploaded on | : | 17.07.2023 |